नियमित दिवाणी दावा क्र. १५४/२०१५
पांडुरंग –वि– जगन्नाथ
निशाणी क्र. ६४ लगत

**<u>उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. डब्ल्यु. एन. जंजाळ यांच्याकडून</u>**

०५. प्रतिवादी क्र.१ माझा पुतण्या आहे. भानुदास पिसे हे माझे सख्खे चुलत भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ जगन्नाथ व भानुदास पिसे विभक्त राहतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ जगन्नाथ भोकरदन येथे राहण्यास आहे व भानुदास पिसे मौजे विरेगाव येथे राहतात. भानुदास पिसे यांना भाऊसाहेब, दिलीप, संजय व विजय अशी चार मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भानुदास यांची चारही मुले विभक्त राहण्यास आहेत. चारही मुलांमध्ये कोणतेही वाद विवाद नाहीत.

०६. प्रतिवादी क्र.१ जगन्नाथ व भानुदास पिसे यांच्या मिळकती माझ्या पाहण्यात आलेल्या नाहीत. मला दावा मिळकतीचा ग्रामपंचायत क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ प्रतिवादी क्र.१ जगन्नाथ यांनी दिलेल्या माहितीनुसार साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

(मयुरेश आर. काळे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
भोकरदन

दिनांकः ०८.०७.२०२६